महाराष्ट्र शासन
**पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,**
मिल कॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती संभाजीनगर- 431 001.
दुरध्वनी क्रमांक 0240-2240591,फॅक्स क्र.0240-2240596
ई मेल :-cp.aurangabad@mahapolice.gov.in

## पोलीस शिपाई भरती २०२२-२३
## उमेदवारांसाठी सुचना

पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर आस्थापनेवरील रिक्त असलेल्या २१२ पोलीस शिपाई पदासाठी शारिरीक मोजमाप व मैदाणी चाचणी दिनांक १९/०६/२०२४ ते २६/०६/२०२४ या कालावधीत विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा परिसर सुतमिल चौक, छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात आली आहे. सदर मैदाणी चाचणीमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे जाहिरातीमधील रिक्त पदाचे १:१० प्रमाणात लेखी परिक्षेकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांचे सामाजिक व समांतर आरक्षणासह गुणांची यादी खालील संकेतस्थळावर तसेच पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील नोटीस बोर्डावर, प्रसिध्द करण्यात आली आहे.

www.aurangabadcitypolice.gov.in व www.mahapolice.gov.in

तरी उमेदवारांनी प्रसिध्द केलेल्या गुणांचे यादीबाबत कांही हरकती/आक्षेप असल्यास या कार्यालयाचे ईमेल cp.aurangabad.dcp.hq@mahapolice.gov.in यावर २४ तासाचे आत सविस्तर हरकती/आक्षेप कागदोपत्री पुरावा व कारणासह सादर करावेत. तद्नंतर प्राप्त झालेल्या कोणत्याही हरकती/आक्षेप विचारात घेतले जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

लेखी परिक्षेसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची लेखी परिक्षा दिनांक ०७/०७/२०२४ रोजी १५.०० वाजता खालील ठिकाणी घेण्यात येणार आहे.

राम नवले यांचे **"गुरुमाऊली वेअर हाऊस"**,
गट नं. १२९, करोडी टोलनाका, ओम-साई हॉटेलचे मागे,
सोलापुर-धुळे राष्ट्रीय महामार्ग-२११, छत्रपती संभाजीनगर.

उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी वर नमुद ठिकाणी दिलेल्या तारखेस परिक्षेचे ११.३० वाजता पोहचणे आवश्यक आहे.

लेखी परिक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी कांही उमेदवार यांनी अनुसूचित जाती (SC), विमुक्त भटक्या जमाती (VJA), भटक्या जमाती-ब (NTB), भटक्या जमाती-क (NTC), भटक्या जमाती-ड (NTD), या प्रवर्गाच्या जागा रिक्त नसतानाही त्यांनी त्यांचे मुळ प्रवर्गातुन आवेदन अर्ज केलेले आहेत. त्यांना अराखिव प्रवर्गाचे अटी व शर्तीचे अधिन राहुन तात्पुरत्यास्वरुपात अराखिव प्रवर्गातुन प्रवेश दिलेला आहे. त्यांना तसे लेखी परिक्षेपुर्वी बंधपत्र देणे आवश्यक आहे. बंधपत्र न दिल्यास त्यांना भरती प्रक्रियेत कोणत्याही टप्यावर अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

भरती प्रक्रिये दरम्यान आवश्यक ते बदल/निर्णय घेण्याचे अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखुन ठेवण्यात आले आहे.

ठिकाण : पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
दिनांक : ०२/०७/२०२४

**( शिलवंत नांदेडकर )**
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर